


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३४८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२९ जुलैं २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# यंदा गणेशभक्तांचा प्रवास सुकर होणार! मध्य रेल्वेकडून मोठा निर्णय ! मुंबई-कोकण विशेष रेल्वे धावणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, मुंबई :** आगामी गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना रेल्वेकडून काही अंशी दिलासा मिळाला आहे. गणेशोत्सवकाळात मुंबईहून कोकणात २४६ विशेष रेल्वे फेऱ्या चालवण्याचा निर्णय मध्य आणि कोकण रेल्वेने घेतला आहे. त्यात विनाआरक्षित रेल्वे फेऱ्यांचाही समावेश आहे. या विशेष रेल्वे फेऱ्यांचे आरक्षण १ ऑगस्टपासून खुले होणार आहे. विशेष रेल्वेगाड्या किमान २० ते कमाल २३ डब्यांसह धावणार आहेत. विनाआरक्षित मेमू फेऱ्या १२ डब्यांसह धावणार आहेत.




**कोणकोणत्या गाड्या असणार?**

गाडी क्रमांक ०११०३/४ सीएसएमटी-सावंतवाडी- सीएसएमटी (३२ फेऱ्या)

०११५१/२ सीएसएमटी-सावंतवाडी-सीएसएमटी (३४ फेऱ्या)

०११५३/४ सीएसएमटी-रत्नागिरी-सीएसएमटी (३२ फेऱ्या)

०११७१/२एलटीटी-सावंतवाडी- एलटीटी (३४ फेऱ्या)

०११३१/२ एलटीटी-सावंतवाडी-एलटीटी द्विसाप्ताहिक (८ फेऱ्या) ०११२९/३० एलटीटी-सावंतवाडी साप्ताहिक (४)

०११६७/८एलटीटी-रत्नागिरी-एलटीटी आठवड्यातून ५ वेळा (२२ फेऱ्या)

०११६५/६ एलटीटी-मडगाव-एलटीटी साप्ताहिक वातानुकूलित (४ फेऱ्या)

०११८५/६ एलटीटी-मडगाव-एलटीटी साप्ताहिक (४ फेऱ्या) आणि पुणे-रत्नागिरी-पुणे १० विशेष फेऱ्या चालवण्यात येतील

**आरक्षण तीन टप्प्यांत !**

विनाआरक्षित म्हणून दिवा-खेड (३२ फेऱ्या) आणि दिवा-चिपळूण-दिवा (३० फेऱ्या) मार्गावर एकूण ६२ मेमू फेऱ्या धावणार आहेत. ११ ते २३ सप्टेंबरदरम्यान मेमू धावणार आहेत. १, २ आणि ३ ऑगस्टला आरक्षण खुले होणार आहे.

**महिला डबे 'संपर्क' क्षेत्रात !**

मध्य रेल्वेने मुंबई उपनगरी रेल्वेवरील सर्व ७९४ महिला डब्यांमध्ये 'इमर्जन्सी टॉकबॅक' यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या सुविधेमुळे महिला प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीत थेट लोकलच्या गार्डशी संपर्क साधता येणार आहे. पश्चिम रेल्वेवर मात्र अद्याप ४५ महिला डबे या सुविधेपासून वंचित आहेत.

आपत्कालीन स्थितीत महिला प्रवाशांना तातडीने मदत मिळावी, यासाठी प्रत्येक महिला डब्यात टॉकबॅक बटण बसवण्यात आले आहे. हे बटण लोकलच्या गार्डच्या केबिनमधील यंत्रणेशी जोडलेले आहे. प्रवाशांनी तीन सेकंद बटण दाबून ठेवल्यानंतर गार्डच्या केबिनमधील इमर्जन्सी रिस्पॉन्स युनिटवर सूचना मिळते. त्यानंतर संबंधित प्रवाशाशी थेट संवाद साधणे शक्य होते. प्रवाशांनी कळवलेल्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गाडी पुढील स्थानकावर थांबवायची की, स्थानकांदरम्यान थांबवायची, याचा निर्णय गार्डकडून घेतला जातो.

**४६८ महिला डब्यांपैकी ४२३ डब्यांत ही सुविधा कार्यान्वित**

मध्य रेल्वेच्या लोकलमधील सर्व ७९४ महिला डब्यांत ही यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. पश्चिम रेल्वेच्या लोकलमधील ४६८ महिला डब्यांपैकी ४२३ डब्यांत ही सुविधा कार्यान्वित आहे. उर्वरित ४५ डब्यांत यंत्रणा बसवण्याचे काम सुरू आहे. महिला डब्यांपाठोपाठ सामान्य डब्यांमध्येही ही सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे. सद्यस्थितीत मध्य रेल्वेवरील ९६ आणि पश्चिम रेल्वेवरील १५० सामान्य डब्यांमध्ये ही यंत्रणा कार्यान्वित आहे.

# तलाव, पाझर तलाव, ओढे-नाले तातडीने भरून द्या - आ.आवताडे यांची मागणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि२८, पंढरपूर :** पावसाळ्याला दीड महिना उलटूनही पंढरपूर आणि मंगळवेढा तालुक्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने संपूर्ण परिसर दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा आहे. खरीप हंगाम अक्षरशः वाया जाण्याच्या मार्गावर असताना, भीमा आणि नीरा नद्यांमधून वाहून जाणारे पाणी वाया जाऊ न देता ते कॅनॉलमार्गे सोडून मतदारसंघातील सर्व तलाव, पाझर तलाव, ओढे आणि नाले तातडीने भरून द्यावेत, अशी जोरदार मागणी आमदार समाधान आवताडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

आमदार आवताडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यंदा पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे पंढरपूर-मंगळवेढा परिसरातील शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. अनेक ठिकाणी पेरण्या वाया गेल्या असून उगवलेली पिके पाण्याअभावी सुकू लागली आहेत. काही गावांम



ध्ये पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

सध्या उजनी धरणातून कालव्यांना पाणी सोडण्यात आले असले, तरी ते अत्यंत कमी दाबाने सुरू असल्याने त्याचा शेवटच्या टोकापर्यंत अपेक्षित लाभ होत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे हे पाणी पूर्ण क्षमतेने सोडून संपूर्ण लाभक्षेत्रातील जलसाठे भरून काढण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

> सध्या भीमा आणि नीरा नद्यांमधून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जात असताना दुसरीकडे पंढरपूर-मंगळवेढा परिसर तहानेने व्याकूळ आहे. त्यामुळे वाहून जाणाऱ्या प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करून जलसाठे भरल्यास केवळ यंदाच्या हंगामालाच नव्हे, तर पुढील काही महिन्यांसाठीही मोठा दिलासा मिळू शकतो, असे मत आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले.

आमदार आवताडे यांनी विशेषतः एनआरबीसी (नीरा-भाटघर उजवा कालवा) मधून पाणी सोडून रांझणी तलाव, कासेगाव तलाव, कोर्टी तलाव, गादेगाव तलाव, बोहाळी तलाव, सात नंबर फाटा परिसरातील साठवण तलाव, तिसंगी येथील तलाव तसेच परिसरातील सर्व पाझर तलाव, ओढे व नाले भरून देण्याची मागणी केली आहे. या जलसाठ्यांमुळे भूजल पातळीत वाढ होऊन हजारो शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

तसेच उजनी धरणातून भीमा नदीत सुरू असलेला विसर्गही वाढवून मंगळवेढा तालुक्यातील नंदूर, बोराळे, कर्जाळ, कात्राळ, हुलजंती या टेल भागासह संपूर्ण परिसरातील ओढे, नाले, पाझर तलाव आणि साठवण तलाव भरून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

याशिवाय पंढरपूर तालुक्यातील वाखरी, गादेगाव परिसरापर्यंत भीमा नदीचे पाणी पोहोचेल, अशा पद्धतीने नियोजन करून परिसरातील सर्व जलस्रोत भरून काढावेत, जेणेकरून शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, या मागणीकडे जलसंपदा विभाग आणि राज्य शासन किती तत्परतेने प्रतिसाद देते, याकडे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या हजारो शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# आमदार काशिनाथदाते यांच्या तत्परतेने चितळकर वस्तीवर अवघ्या ९ तासांत प्रकाश

**अक्षराज : राजकुमार इकडे**



**दि.२८, सुपा (अहिल्यानगर) :** काही दिवसापूर्वी मौजे रायतळे येथील चितळकर वस्तीवर घडलेल्या जबर चोरी आणि दरोड्याच्या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच, कर्तव्यदक्ष आमदार काशिनाथ दाते यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पीडित कुटुंबाची आणि ग्रामस्थांची सांत्वनपर भेट घेतली व धीर दिला.

पाहणीदरम्यान, भविष्यात सुरक्षेच्या दृष्टीने आणि अशा घटनांना आळा घालण्यासाठी चितळकर वस्तीजवळ 'हाय मॅक्स पोल' ची अत्यंत गरज असल्याचे ग्रामस्थांनी साहेबांच्या निदर्शनास आणून दिले.जनतेच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड नाही साहेबांनी क्षणाचाही विलंब न लावता लागलीच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना आणि यंत्रणेला सूचना दिल्या.

आमदार साहेबांनी फोन लावून सूचना दिल्या. व अवघ्या काही तासांच्या आत या दुर्गम वस्तीवर हाय मॅक्स सोलर पोल उभारून दिव्यांचा लखलखाट करण्यात आला. आमदार साहेबांच्या या अभूतपूर्व वेगवान कार्यपद्धतीमुळे रायतळे गावातील सर्व ग्रामस्थ आणि चितळकर वस्तीवरील नागरिकांनी मनःपूर्वक समाधान व्यक्त केले आहे. त्यावेळी राहुल पाटील शिंदे, (भाजप तालुका अध्यक्ष), वसंतदादा चेडे, दत्तानांना पवार, मनोज मुंगसे, कोठुळे साहेब (पोलीस उपनिरीक्षक सुपा पोलीस स्टेशनं) गणेश घुले (ग्रामसेवक )प्रशांत भोईटे (तलाठी) तसेच रायतळे ग्रामस्थ सुदाम येणारे, योगेश (राहुल) येणारे, शिवदास चितळकर,गोरख साबळे, मनोज चितळकर, प्रमोद चितळकर, देविदास मेमाणे,हृतिक दरेकर हे उपस्थित होते.

# एमआरव्हीसीच्या नवीन समभाग भांडवल गुंतवणुकीला महाराष्ट्र मंत्रिमंडळाची मंजुरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, मुंबई :** मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (एमआरव्हीसी) उपनगरीय रेल्वेच्या विस्तार प्रकल्पांसाठी महामंडळाने प्रस्तावित केलेल्या नवीन प्राधिकृत समभाग भांडवल (इक्विटी) गुंतवणुकीतील राज्य सरकारच्या हिश्श्याला महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिल्याने मोठे प्रोत्साहन मिळाले आहे.

या वाढीव भांडवलामुळे एमयूटीपी- ३, एमयूटीपी- ३ए व एमयूटीपी- ३बी सह ६४,६४४ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतींचे रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प कार्यक्षमतेने राबविण्यास एमआरव्हीसीला आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

- मुंबईतील वाढत्या पायाभूत रेल्वे प्रकल्पांना चालना देण्यासाठी खेळत्या भांडवलात वाढ करण्यासाठी कंपनीचे प्राधिकृत समभाग भांडवल २५ कोटी रुपयांवरून ५०० कोटीपर्यंत वाढविण्याची मागणी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशने महाराष्ट्र सरकारकडे केली




होती. केंद्राने आपल्या वाट्याला मंजुरी दिली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याच्या हिश्यातील भांडवलाला मान्यता देण्यात आली. तसेच महामंडळाच्या एकूण समभाग भरणा केलेले भांडवल सुद्धा २५ कोटींवरून २२५ कोटींपर्यंत वाढवण्याचा समावेश आहे.

- एमआरव्हीसी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील वाढत्या रेल्वे प्रकल्पांचा आवाका पाहता त्यांचे २५ कोटी रुपयांचे भरणा केलेले भांडवल अपुरे आहे. त्यासाठी खेळत्या भांडवलामध्ये वाढ होणे अपेक्षित होते. या मंजुरीमुळे २०० कोटी रुपयांच्या नवीन समभाग

> महाराष्ट्र मंत्रिमंडळाने नवीन इक्विटी प्रस्तावाला दिलेली मंजुरी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. ज्यामुळे एमआरव्हीसीचा आर्थिक पाया अधिक मजबूत होणार आहे. या वाढीव भांडवली आधारामुळे आम्हाला मोठे उपनगरीय रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प प्रभावीपणे राबवता येणार आहेत. तसेच क्षमता वाढीला गती देता येईल आणि लाखो प्रवाशांना अधिक सुरक्षित, जलद व कार्यक्षम वाहतूक सेवा देण्यासाठी मुंबईच्या रेल्वे कार्य क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणे सुरू ठेवता येईल.
>
> **- (विलास सोपान वाडेकर, सीएमडी, एमआरव्हीसी)**

भांडवल गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. ही गुंतवणूक भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांचा मध्ये सध्याच्या ५१:४९ या समभाग भांडवल गुणोत्तरानुसार विभागली जाणार आहे. त्यानुसार भारत सरकार १०२ कोटी रुपये तर महाराष्ट्र सरकार ९८ कोटी रुपयांचे योगदान देणार आहे.

या वाढीव भाग भाडवलामुळे एमआरव्हीसीचा आर्थिक पाया अधिक मजबूत होणार आहे. त्याचा फायदा एमयूटीपी- ३, एमयूटीपी- ३ए व एमयूटीपी- ३ बी सह ६४,६४४ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतींचे रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्प कार्यक्षमतेने राबविण्यास पाठबळ मिळणार आहे. तसेच भविष्यातील उपनगरीय रेल्वे पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी संसाधने उभारण्याची एमआरव्हीसीची क्षमता वाढणार आहे. परिणामी संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात क्षमता, कनेक्टिव्हिटी आणि प्रवाशांची सोय अधिक सुधारणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशातील लाखो उपनगरीय रेल्वे प्रवाशांचा दैनंदिन प्रवास सुधारण्याच्या उद्देशाने असलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

## दिवा शहरात खड्ड्यांची शांती आंदोलन - मनसेचा अनोखा निषेध

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील रस्त्यांवर पडलेल्या प्रचंड खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेने एक अनोखे आंदोलन हाती घेतले आहे. याला खड्ड्यांची शांती असे नाव देण्यात आले आहे.

प्रशासन गप्प, खड्डे मात्र बोलके महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सालाबादप्रमाणे याही वर्षी दिवा शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे निर्माण झाले आहेत. नेहमीप्रमाणे याही वर्षी ठाणे महानगरपालिकेचा सार्वजनिक बांधकाम विभाग डोळे बंद करून बसला आहे. दिव्यातील लोकप्रतिनिधीही यावर मुग गिळून गप्प बसले आहेत.

अशा परिस्थितीत नागरिकांनीच पुढे येऊन मार्ग काढण्याची वेळ आली आहे, असे मनसेचे म्हणणे आहे.

**खड्ड्यांनाच करणार विनंती !**

यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना तर्फे येत्या ३० जुलै रोजी दिवा पूर्वेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात खड्ड्यांची शांती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात खड्ड्यांची शांती करून त्यांनाच विनंती केली जाणार आहे की सर्वसामान्य जनतेला जास्त त्रास देऊ नका.

**कार्यक्रमाची माहिती**

- दिनांक : गुरुवार, ३० जुलै २०२६
- वेळ: सकाळी ११:३० वाजता
- ठिकाण: छत्रपती शिवाजी महाराज चौक, दिवा (पूर्व)
- आयोजक: महाराष्ट्र नवनिर्माण सेना, दिवा शहर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनाने सर्व दिवेकरांना या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठीचा हा व्यंगात्मक पण प्रभावी मार्ग असल्याचे स्थानिक नागरिकांकडून बोलले जात आहे.




## 'गुरुपौर्णिमा'

मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी असल्याने नवीन वर्ष सुरु झाले कि कुणाला शिवजयंतीचे वेध लागतात, कुणाला गणेशोत्सवाचे तर कुणाला नवरात्रीचे. अध्यात्मिक साधना करणाऱ्या साधकाला मात्र आस लागलेली असते ती गुरुपौर्णिमेची. गुरुपौर्णिमा हा साधक आणि शिष्यांच्या जीवनातील सर्वात मोठा उत्सव. मायेच्या भवसागरातून शिष्याला आणि साधकाला अलगदपणे बाहेर काढणारे, त्याच्याकडून आवश्यक ती साधना करवून घेणारे आणि कठीण समयी त्याला अत्यंत जवळिकीने अन् निरपेक्ष प्रेमाने आधार देऊन संकटमुक्त करणारे हे गुरुच असतात. अशा परमपूजनीय गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. गुरुपौर्णिमा हा उत्सव सर्वत्र आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. (तामिळ प्रदेशात व्यासपूजा ज्येष्ठ पौर्णिमेस साजरा करतात.) गुरु म्हणजे ईश्वराचे सगुण रूप ! वर्षभर प्रत्येक गुरु आपल्या भक्तांना अध्यात्माचे बोधामृत भरभरून देत असतात. त्या गुरूंच्या प्रती अनन्य भावाने कृतज्ञता व्यक्त करणे, हा गुरुपौर्णिमा साजरा करण्यामागील उद्देश आहे. शिष्याने कोणती साधना करावी ते गुरु जाणतात. त्याला नुसती साधना सांगून ते थांबत नाहीत, तर त्याच्याकडून साधना करवून घेतात. हेच गुरूंचे खरे शिकवणे असते. गुरूंचे लक्ष शिष्याच्या ऐहिक सुखाकडे नसते, कारण ते प्रारब्धानुसार असते. गुरूंचे लक्ष फक्त शिष्याच्या आध्यात्मिक उन्नतीकडे असते. श्री शंकराचार्यांनी म्हटले आहे, ''ज्ञानदान करणार्या सद्गुरूंना शोभेल अशी उपमा या त्रिभुवनात कोठेही नाही. त्यांना परिसाची उपमा दिली, तरी तीही अपुरी पडेल; कारण परीस लोखंडास सुवर्णत्व देत असला, तरीही त्याचे परीसत्व देऊ शकत नाही.'' गुरूंची महती वर्णन करायला शिष्याला शब्द अपुरे पडतात. गुरु आतही आहेत आणि बाहेरही आहेत. तुम्ही अंतर्मुख व्हावे, अशी परिस्थिती गुरु निर्माण करतात. तुम्हाला आत्म्याकडे म्हणजेच ब्रह्माकडे ओढावे, म्हणून गुरु आतही म्हणजे हृदयात सिद्धता करत असतात. हिंदु संस्कृतीमध्ये गुरूंनी शिष्याकरवी करून घेतलेले कार्य अनेक उदाहरणांद्वारे वर्णन करता येते. आर्य चाणक्य आणि चंद्रगुप्त मौर्य, रामदासस्वामी आणि छत्रपती शिवाजी महाराज, रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद या गुरु-शिष्य जोड्या आणि त्यांचे अद्वितीय कार्य आज जगाला परिचित आहे. या सगळ्या उदाहरणांमधून अधर्माच्या विरोधात लढण्याचा श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश सर्वत्र पोहोचतो.

गुरुपौर्णिमा या शुभदिनी दिवशी गुरुतत्त्व (ईश्वरी तत्त्व) नेहमीच्या तुलनेत १ सहस्र (हजार) पटीने कार्यरत असते. त्यामुळे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने केलेली सेवा आणि त्याग (सत्साठी अर्पण) यांचा इतर दिवसांच्या तुलनेत १ सहस्र पटीने लाभ होतो; म्हणून गुरुपौर्णिमा ही गुरुकृपेची (ईश्वरकृपेची) एक अनमोल पर्वणीच आहे. 'गुरु-शिष्य परंपरा' ही हिंदूंची लक्षावधी वर्षांची चैतन्यमय संस्कृती आहे; परंतु काळाच्या प्रवाहात रज-तमप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे या महान अशा गुरु-शिष्य परंपरेची उपेक्षा होत आहे. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरुपूजन होते, तसेच गुरु-शिष्य परंपरेची महती समाजाला सांगता येते. थोडक्यात गुरुपौर्णिमा म्हणजे गुरु-शिष्य परंपरेचे जतन करण्याची सुसंधीच होय ! प्रत्येक गुरूंचे शिष्य या दिवशी त्यांच्या गुरूंची पाद्यपूजा करतात आणि त्यांना गुरुदक्षिणा मनोभावे अर्पण करतात. या दिवशी व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. गुरुपरंपरेत महर्षि व्यास यांना सर्वश्रेष्ठ गुरु मानले आहे. सर्व ज्ञानाचा उगम महर्षि व्यास यांच्यापासून होतो, अशी भारतियांची धारणा आहे. कुंभकोणम् आणि शृंगेरी ही शंकराचार्यांची दक्षिण भारतातील प्रसिद्ध पिठे आहेत. या ठिकाणी व्यासपूजेचा महोत्सव साजरा होतो. व्यासमहर्षी हे शंकराचार्यांच्या रूपाने पुन्हा अवतीर्ण झाले, अशी भाविकांची श्रद्धा आहे; म्हणून संन्यासी लोक या दिवशी व्यासपूजा म्हणून शंकराचार्यांची पूजा करतात. स्नानादी नित्यकर्मे आटोपून 'गुरुपरम्परासिद्ध्यर्थं व्यासपूजां करिष्ये ।' असा संकल्प करतात. एक धूतवस्त्र अंथरून त्यावर गंधाने पूर्वेकडून पश्चिमेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे अशा बारा रेघा काढतात. ते म्हणजे महर्षि व्यास यांचे व्यासपीठ होय. मग ब्रह्मा, परात्परशक्ती, व्यास, शुकदेव, गौडपाद, गोविंदस्वामी आणि शंकराचार्य यांचे त्या व्यासपिठावर आवाहन करून त्यांची षोडशोपचारे पूजा करतात. याच दिवशी दीक्षागुरु आणि मातापिता यांचीही पूजा करण्याची प्रथा आहे.'

(संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते')

**- जगन घाणेकर**

# वन्यजीव जगतील तरच मानव जीवन वाचणार



**-डॉ.प्रीतम भी.गेडाम**
**मोबाईल**
**८२३७४ १७०४१**

पृथ्वीवरील प्रत्येक जीव आपल्या स्वतंत्र अस्तित्वाने आणि वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेद्वारे नैसर्गिक समतोल राखण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो. अन्नसाखळीतील प्रत्येक घटक आवश्यक आहे, कारण एखाद्या एका जीवाचेही असंतुलन संपूर्ण परिसंस्थेवर परिणाम करू शकते. आजच्या काळात मनुष्याला वगळता इतर सर्व जीव निसर्गसंवर्धनात आपली भूमिका पार पाडत आहेत. स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसे अन्न हे सर्वांच्या जीवनासाठी आवश्यक असून ते फक्त पर्यावरण निरोगी आणि संतुलित असेल तरच उपलब्ध होऊ शकते. सूक्ष्मजीव माती सुपीक बनवतात, तर पक्षी आणि वन्यप्राणी बियांचा प्रसार करून नवीन वनस्पती व जंगलांच्या वाढीस मदत करतात. जंगलातील जीव सुरक्षित राहिले तर जंगल हिरवेगार राहते, ऋतुचक्र संतुलित राहते, जलस्रोत सुरक्षित राहतात आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण होते. त्यामुळे प्रदूषण कमी होते, रोगांचा धोका घटतो आणि जीवनमान अधिक चांगले होते. प्रत्यक्षात वन्यजीव हे निसर्गाचे खरे रक्षक आहेत, कारण पर्यावरणीय समतोल राखण्यात त्यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते. मनुष्याशिवाय निसर्ग स्वतःला पुन्हा वेगाने सावरू शकतो; परंतु निसर्गाशिवाय मानवजीवनाची कल्पनाही अशक्य आहे. त्यामुळे निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे ही आपली सर्वात मोठी जबाबदारी आहे.

प्रत्येक सजीवाला आपल्या नैसर्गिक अधिवासात जगण्याचा अधिकार आहे. मात्र, गेल्या काही दशकांमध्ये वाढलेल्या मानवी हस्तक्षेपामुळे वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या संघर्षात दोघांनाही जीवितहानीचा सामना करावा लागतो. स्वातंत्र्यपूर्व काळात राजे-महाराजे आणि इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर शिकार केल्यामुळे अनेक वन्यप्राण्यांची संख्या अत्यंत कमी झाली. अनेक प्रजाती कायमस्वरूपी नाम शेष झाल्या. वन्यजीवांची झपाट्याने घटणारी संख्या रोखण्यासाठी सरकारने विविध कायदे केले आहेत. आयआयटी बॉम्बे आणि सस्त्रा विद्यापीठातील संशोधकांच्या संशोधनानुसार, २०१५ ते २०१९ या कालावधीत देशात प्रत्येक १ चौ.कि.मी. जंगलवाढीच्या बदल्यात सुमारे १८ चौ.कि.मी. जंगल नष्ट झाले. नैसर्गिक, दाट आणि जुनी जंगले झपाट्याने नाहीशी होत आहेत. हीच परिस्थिती कायम राहिली तर त्या जंगलांमध्ये राहणाऱ्या वन्यजीवांचे अस्तित्व गंभीर संकटात येईल.




देशात वाढत्या शहरीकरणामुळे पारंपरिक शेती कमी होत आहे. शहराजवळच्या खेडोपाडी कॉंक्रीटची जंगले उभी राहत असून नैसर्गिक जंगले आकुंचन पावत आहे आणि मानवी हालचाली सातत्याने वाढत आहेत. जंगलाजवळ निसर्गाच्या सानिध्यात फार्महाऊस उभारण्याचा कल वाढला आहे. विकासाच्या नावाखाली जंगलातून महामार्ग बांधले जात आहेत तसेच जंगलतोड करून उत्खनन सुरू आहे. यामुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास थेट नष्ट होत आहेत आणि वर्षानुवर्षे नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढत आहे.

ज्या जंगलांमध्ये वाघ राहतात, तेथील परिसंस्था अधिक समृद्ध आणि संतुलित असते. वाघ हा केवळ एक वन्यप्राणी नसून संपूर्ण जंगलाचा संरक्षक आहे. त्याच्या अस्तित्वासाठी विशाल, सुरक्षित आणि मानवी हस्तक्षेपापासून मुक्त अधिवास आवश्यक असतो. अशा अधिवासांचे संरक्षण केल्याने असंख्य वन्यप्राणी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपूर्ण जैवविविधता सुरक्षित राहते. वाघ शाकाहारी प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतो, त्यामुळे वनस्पतींचा अतिवापर टळतो आणि नैसर्गिक समतोल अबाधित राहतो. सुरक्षित जंगले अधिक प्रमाणात कार्बन शोषून घेतात आणि हवामान बदलाचे दुष्परिणाम कमी करण्यास मदत करतात. तसेच दाट जंगले पावसाच्या पाण्याचा प्रवाह नियंत्रित करून पुराची तीव्रता कमी करतात आणि कोट्यवधी लोकांना गोड्या पाण्याचा पुरवठा करतात. त्यामुळे वाघ आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण म्हणजे संपूर्ण पर्यावरणाचे संरक्षण होय. हे संरक्षण मानवजीवन, शेती, जलस्रोत आणि भावी पिढ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे.

दरवर्षी २९ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश संकटग्रस्त मोठ्या मांजरांच्या प्रजाती आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाच्या संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा आहे. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. वाघ वाचवा, जंगल वाचवा, निसर्ग वाचवा हा संदेश याच कारणासाठी दिला जातो, कारण वाघ टिकले तरच आपणही सुरक्षित राहू. ही बाब प्रत्येकाने समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. ग्लोबल टायगर फोरमच्या माहितीनुसार, जगभरातील जंगलांमध्ये केवळ ५,६६० वाघ शिल्लक आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या भारतातील वाघांची स्थिती: सह-भक्षक आणि भक्ष्य - २०२२ या अहवालानुसार त्यापैकी ३,६८२ वाघ भारतात आढळतात. दरवर्षी रस्ते अपघात, शेतांमधील विजेचा धक्का, उघड्या विहिरीत पडणे आणि अवैध शिकारीमुळे असंख्य वन्यजीवांचा अकाली व दुर्दैवी मृत्यू होतो. विदर्भ (महाराष्ट्र) येथील वृत्तपत्रांमध्ये विशेषतः वाघांच्या मृत्यूच्या घटना वारंवार प्रसिद्ध होत असतात. सातत्याने वाढणारे वाघांचे मृत्यू हे गंभीर चिंतेचे कारण आहे. गेल्या सहा महिन्यांत महाराष्ट्रात २४ वाघांचा मृत्यू झाला आहे. तसेच २०२५ मध्ये मध्यप्रदेशात ५४ वाघांचा, तर महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रात ४१ वाघांचा मृत्यू झाला.

वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर यांच्या माहितीनुसार प्रत्येक वाघाच्या अंगावरील पट्ट्यांचा नमुना वेगळा असतो, जसा प्रत्येक माणसाच्या बोटांच्या ठशांचा नमुना वेगळा असतो. मादी वाघीण आपल्या पिल्लांशी संवाद साधण्यासाठी कानामागील पांढऱ्या खुणांचा संकेत म्हणून वापर करते. जगातील निम्म्याहून अधिक वाघ भारतात आढळतात, ही आपल्या देशाच्या समृद्ध जैवविविधतेची मोठी साक्ष आहे. वाघ गुरगुरणे, डरकाळी फोडणे, कण्हणे, फुत्कार काढणे आणि धापा टाकण्यासारख्या विविध आवाजांद्वारे संवाद साधतात. शास्त्रज्ञांच्या मते वाघ सुमारे २० लाख वर्षांपासून पृथ्वीवर अस्तित्वात आहेत. मात्र, गेल्या शंभर वर्षांत मानवी हस्तक्षेप, जंगलतोड आणि अवैध शिकारीमुळे त्यांच्या संख्येत सुमारे ९७ टक्क्यांची घट झाली आहे. त्यामुळे त्यांना संकटग्रस्त प्रजाती मानले जाते. आजही अवैध शिकार हा त्यांच्या अस्तित्वासमोरील सर्वात मोठा धोका आहे. वर्ल्ड वाईड फंड फॉर नेचर आशियामध्ये त्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहे. २०१६ मध्ये काही भागांत वाघांची संख्या वाढल्याची नोंद झाली असली, तरी दक्षिण-पूर्व आशियात त्यांची संख्या अजूनही घटत आहे.

मनुष्यासारख्या बुद्धिमान प्राण्याकडे आज कायदेशीर अधिकार, प्रगत तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था, सोशल मीडिया, नातेवाईक, मित्रपरिवार आणि समाज असे अनेक आधार उपलब्ध आहेत. तरीसुद्धा उच्चशिक्षित आणि जागरूक असूनही अनेक प्रसंगी माणूस स्वतःला असहाय्य आणि फसवला गेल्यासारखे अनुभवतो. स्वतःच्या समस्यांच्या निराकरणासाठी सरकारी कार्यालये, लोकप्रतिनिधी आणि न्यायालयांचे उंबरठे झिजवूनही अनेकदा त्याला समाधानकारक न्याय मिळत नाही. पावसाळ्यात पूर, उन्हाळ्यात दुष्काळ, उष्णतेची लाट आणि पाण्याची टंचाई, हिवाळ्यात धुके, हायपोथर्मिया तसेच विविध नैसर्गिक आपत्ती अशा संकटांना मानवालाही सामोरे जावे लागते. सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध असूनही जर माणूस अशा परिस्थितीत हतबल होत असेल, तर त्याच्या तुलनेत वन्यप्राण्यांची अवस्था किती कठीण असेल, याची कल्पनाही करणे अवघड आहे.

क्षणभर मुक्या वन्यजीवांच्या दृष्टीकोनातून विचार करून पाहूया. त्यांना माणसाकडून कोणतीही अपेक्षा नसते. त्यांना केवळ निसर्गाकडून अन्न आणि पाण्याची गरज असते. मानवी हस्तक्षेप नसल्यास निसर्ग सर्व सजीवांचे पालनपोषण करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. मग आपणच वन्यजीवांना त्रास देत आहोत का? की वन्यजीव आपल्याला त्रास देत आहेत? वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाला नेमके जबाबदार कोण? या प्रश्नांचा वेळेवर, संवेदनशीलतेने आणि सखोलपणे विचार करणे आज अत्यंत आवश्यक आहे. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

जंगलांचे संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण, अवैध शिकारीला आळा, पर्यावरणपूरक विकास आणि निसर्गाविषयी संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारल्याशिवाय मानव आणि वन्यजीव यांच्यातील समतोल कायम राहू शकणार नाही. वन्यजीव टिकले तरच जंगले टिकतील, जंगले टिकली तरच पर्यावरण सुरक्षित राहील आणि पर्यावरण सुरक्षित राहिले तरच मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहील. म्हणूनच - वन्यजीव वाचवा, निसर्ग वाचवा आणि मानवजातीचे अस्तित्व सुरक्षित ठेवा.

## व्यास पौर्णिमा

अक्षराज

गुरू पौर्णिमा उत्सव
आगळाचं अहा सण
व्यक्तकराय कृतज्ञता
गुरुरायांचे दिव्यऋण

अंश गुरू रे परमेश्वरी
निर्गुणाचे रुप स गुण
लोखंडास करे सुवर्ण
परिसाचे मौलिकगुण

गुरूसम योग्य शिष्य
अनुगुण हो दोघेजण
अर्जुनास प्रदानविद्या
धन्यधन्य ते गुरूद्रोण

दत्तात्रय हे जगत् गुरु
चोवीसगुरु केले पण
गुरूमहात्म्य जाणती
असूनि स्वता निपुण

व्यासगुरूंच्या रुपांत
उध्दरले रे कण कण
उपकार मानते विश्व
युगे न् युगे क्षणो क्षण

पेरु या बीजे सद्गुण
दुर्गुणांचे उपटून तण
गळूनपडावे तमोगुण
पालवी रुपा रजोगुण


**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## गुरु : ज्ञान, संस्कार आणि सृजनशीलतेचा अखंड दीप

भारतीय संस्कृतीचा विचार केला तर गुरु ही संकल्पना केवळ शिक्षणापुरती मर्यादित नसून जीवनाला दिशा देणारी एक महान परंपरा आहे. गुरु म्हणजे अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा, व्यक्तिमत्त्व घडविणारा आणि जीवनमूल्यांची जपणूक करणारा मार्गदर्शक. म्हणूनच आपल्या संस्कृतीत गुरुचे स्थान देवतांपेक्षाही श्रेष्ठ मानले गेले आहे. आषाढ पौर्णिमेचा दिवस आपण गुरु पौर्णिमा म्हणून साजरा करतो. हा दिवस केवळ गुरुंचा सन्मान करण्याचा नाही, तर त्यांच्या ऋणाची जाणीव ठेवून स्वतःला अधिक सक्षम आणि सुसंस्कृत बनविण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीचे स्रोत अमर्याद झाले आहेत. एका क्लिकवर जगभरातील माहिती उपलब्ध होते. मात्र माहिती आणि ज्ञान यामध्ये मूलभूत फरक आहे. माहिती माणसाला बुद्धिमान बनवू शकते, पण ज्ञान त्याला विवेकी बनवते. हा विवेक, ही मूल्ये आणि जीवन जगण्याची योग्य दिशा गुरुच देऊ शकतो.

एक कला शिक्षक म्हणून गेली अनेक वर्षे विद्यार्थ्यांसोबत काम करताना मला जाणवले की प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये एक कलाकार दडलेला असतो. काही विद्यार्थ्यांच्या हातात रंग असतात, काहींच्या मनात कल्पना असतात, तर काहींच्या लेखणीत सुंदर अक्षरांची ताकद असते. त्या प्रत्येक सुप्त गुणांना ओळखून त्यांना आकार देण्याचे भाग्य शिक्षकाला लाभते. विद्यार्थी पहिल्यांदा स्वतःचे चित्र पूर्ण करतो, सुंदर हस्ताक्षरासाठी पारितोषिक मिळवतो किंवा आत्मविश्वासाने रंगमंचावर उभा राहतो, तेव्हा शिक्षकाच्या डोळ्यांत दिसणारा



आनंद हा शब्दांत व्यक्त करता येत नाही.

कला ही केवळ विषय नाही; ती जीवन जगण्याची संवेदनशील दृष्टी आहे. चित्रकला विद्यार्थ्यांना निरीक्षण शिकवते, हस्ताक्षर शिस्त शिकवते, कॅलिग्राफी संयम शिकवते आणि सृजनशीलता आत्मविश्वास देते. कला माणसाला अधिक माणूस बनवते. म्हणूनच प्रत्येक शाळेत कला शिक्षणाला योग्य स्थान मिळणे ही काळाची गरज आहे.

गुरु आणि शिष्य यांचे नाते हे विश्वास, प्रेम आणि समर्पणावर उभे असते. गुरु विद्यार्थ्याला फक्त यशस्वी होण्याचा मार्ग दाखवत नाही, तर चांगला माणूस होण्याची प्रेरणाही देतो. समाजात जबाबदार, संवेदनशील आणि चारित्र्यसंपन्न नागरिक घडविण्याचे महान कार्य शिक्षक निःस्वार्थपणे करत असतात. म्हणूनच शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार आहे.

आज आपण ज्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहोत, त्या प्रत्येक यशामागे कोणत्या ना कोणत्या गुरुचे मार्गदर्शन दडलेले आहे. डॉक्टर, अभियंता, वैज्ञानिक, कलाकार, लेखक, प्रशासकीय अधिकारी किंवा उद्योजक प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षकाने दिलेली प्रेरणा अमूल्य असते. त्यामुळे गुरुंचे ऋण कधीही फेडता येत नाही; ते केवळ कृतज्ञतेने स्वीकारता येते.

गुरु पौर्णिमा हा दिवस आपल्याला आपल्या गुरुंना स्मरण करण्याची, त्यांच्या चरणी कृतज्ञतेची पुष्पे अर्पण करण्याची आणि त्यांच्या आदर्शांचा वारसा पुढे नेण्याची प्रेरणा देतो. विद्यार्थ्यांनी गुरुंनी दिलेले संस्कार आयुष्यभर जपावेत, तर शिक्षकांनीही ज्ञानदानाबरोबरच मूल्यशिक्षणाची परंपरा अधिक सक्षम करावी.

आजच्या या पावन दिवशी माझ्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश देणाऱ्या सर्व गुरुजनांना मी विनम्र अभिवादन करतो. त्यांच्या आशीर्वादामुळेच मला कला शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, सौंदर्यदृष्टी आणि संस्कार रुजविण्याची संधी मिळत आहे. हे कार्य अधिक समर्पणाने आणि प्रामाणिकपणे करत राहणे, हीच माझ्यासाठी गुरु पौर्णिमेची खरी गुरुदक्षिणा असेल.

गुरु हा केवळ ज्ञानदाता नसतो; तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारा, आत्मविश्वास जागवणारा आणि जीवनाला अर्थ देणारा दीपस्तंभ असतो. त्या दिव्य प्रकाशामुळेच समाजाचे भविष्य उज्ज्वल होत असते.

**सर्व गुरुजनांना गुरु पौर्णिमेच्या मनःपूर्वक शुभेच्छा!**

**- श्रीराम महाजन**
**कला शिक्षक**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल, चेंबूर मुंबई**
**मो. ९९६७५८७३००**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# पाटण तालुक्यात बेंदूर सण मोठ्या धूम धडाक्यात साजरा



अक्षराज : सुरेश संकपाळ

दि.२८, पाटण (सातारा) : पाटण तालुक्यात कृषी संस्कृतीचा मानबिंदू असलेला बेंदूर सण मोठ्या उत्साहात आणि पारंपारिक जल्लोषात साजरा करण्यात आला. बळीराजाचा खरा सोबती असलेल्या बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण म्हणजे शेतकरी आणि निसर्ग यांच्यातील अतूट नात्याचे प्रतीक आहे. सणाच्या आदल्या दिवशी परंपरेनुसार बैलांच्या खांद्याची (खांद मळणी) पूजा करण्यात आली. सकाळपासूनच शेतकऱ्यांनी आपल्या बैलांना नदीवर नेऊन स्वच्छ धुऊन, शिंगे घोळून त्यांच्या शिंगांना रंगरंगोटी करून, गळ्यात घुंगरांच्या माळा, रंगीबेरंगी फुलांच्या माळा, अंगावर झूल आणि कपाळावर हळद-कुंकू लावून सजवले. बैल सजले की बळीराजाचे रूपच खुलते, असे चित्र सर्वत्र दिसत होते.

डॉल्बीच्या ठेक्यावर भव्य मिरवणूक दुपारी ३ वाजल्यापासून मोरे गल्ली येथून बैलांच्या भव्य मिरवणुकीला सुरुवात झाली. लायब्ररी चौक,पाटण मुख्य बाजारपेठ, झेंडा चौक, जुने बस स्थानक, नवीन बस स्थानक ते रामापूर या मुख्य मार्गावर डीजे डॉल्बीच्या दणदणाटात आणि मोठ्या उत्साहात तरुणांनी व लहान मुलापासून ते आबालवृद्धापर्यंत ठेका धरत नृत्य केले. संपूर्ण पाटण शहरात सणाचा माहोल रात्री उशिरापर्यंत चालू होता. रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी बैलांची मिरवणूक बघण्यासाठी गर्दी केली होती. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे महिला वर्गाचा उत्स्फूर्त सहभाग. प्रत्येक घरात महिलांनी मातीपासून तयार केलेल्या बैलजोडीची मनोभावे पूजा केली. बैलांना पुरणपोळीचा गोड नैवेद्य दाखवला. बैलांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवला आणि आभार मानले. बैल म्हणजे आमच्या कुटुंबाचाच भाग, त्यांच्यामुळेच आमची शेती पिकते अशा भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या. धावपळीच्या आधुनिक युगात ट्रॅक्टर आले, तंत्रज्ञान आले तरी बैलाविषयी असलेली कृतज्ञता जपली आहे. बेंदूर हा केवळ सण नाही, तर शेतकऱ्याच्या जीवनातील प्राण असलेल्या मुक्या जीवाचा गौरव आहे. ही परंपरा पुढच्या पिढीनेही अशीच जपावी, हाच या उत्सवाचा खरा संदेश आहे.

# पालम तालुक्यात SIR अंतर्गत ९४.७१ टक्के काम पूर्ण - तहसीलदार वाघमारे

अक्षराज : प्रतिनिधी

दि.२८, पालम (परभणी) : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण (SIR) अभियानांतर्गत पालम तालुक्यातील ९४. ७१ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित मतदारांनी ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत आपले गणना (Enumeration Form) फॉर्म भरून संबंधित बीएलओकडे जमा करावेत, असे आवाहन तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे व निवडणूक विभाग नायब तहसीलदार विनोद पवार यांनी केले आहे. यापूर्वी डखड अंतर्गत गणना फॉर्म भरण्याची अंतिम मुदत २९ जुलै होती. मात्र, भारत निवडणूक आयोगाने ती वाढवून ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत केली आहे. ३० जून ते ८ ऑगस्ट या कालावधीत ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पालम तालुक्यात एकूण ९६,०८८ मतदार असून त्यापैकी ९१,००८ मतदारांचे गणना फॉर्म (EF) भरून घेण्यात आले आहेत. अद्याप ५,०८० मतदारांचे फॉर्म भरणे बाकी असून तालुक्यातील SIR अभियानाचे ९४. ७१ टक्के काम पूर्ण झाले आहे. या अभियानासाठी १० सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (AERO), १० पर्यवेक्षक तसेच १०५ बीएलओ व बीएलओ सहाय्यक नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून डखड चे कामकाज वेगाने सुरू आहे. या प्रक्रियेनंतर १७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर या कालावधीत मतदारांकडून दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. प्राप्त दावे व हरकतींवर सुनावणी घेऊन त्यांचा निपटारा करण्यात येईल आणि १९ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

तहसील प्रशासनाने तालुक्यातील सर्व पात्र मतदारांना आवाहन केले आहे की, ज्यांनी अद्याप डखड गणना फॉर्म भरलेला नाही त्यांनी ८ ऑगस्ट पूर्वी संबंधित बीएलओकडे फॉर्म भरून जमा करून या प्रक्रियेत सहभागी व्हावे.

# वारीत भक्तीबरोबर स्वच्छतेचाही संदेश ८५२ स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांचा पंढरीत स्वच्छता संकल्प



अक्षराज : विकास सरवळे

दि.२८, पंढरपूर : आषाढी वारीत लाखो भाविकांच्या सेवेसाठी आणि स्वच्छतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने भारत स्काऊट्स अँड गाईड्स, जिल्हा कार्यालय सोलापूर यांच्या वतीने सन २०२६-२७ चा वार्षिक आषाढी वारी स्वच्छता सेवा प्रकल्प मंगळवार, दि.२८ जुलै रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. जिल्हाभरातील विविध शाळांमधील ८५२ स्काऊट-गाईड विद्यार्थी व ९२ शिक्षक-शिक्षिका यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वच्छ पंढरीचा संदेश दिला. या उपक्रमाचे आयोजन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जिल्हा मुख्य आयुक्त कादर शेख, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा जिल्हा आयुक्त स्काऊट सचिन जगताप, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जिल्हा आयुक्त गाईड रूपाली भावसार, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा जिल्हा चिटणीस विठ्ठल ढेपे, लेखाधिकारी समग्र शिक्षा अभियान तथा जिल्हा कोषाध्यक्ष राहुल सलगर, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट शंकर यादव, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड सुलक्षणा लोखंडे, जिल्हा संघटक स्काऊट शीधर मोरे, जिल्हा संघटक गाईड अनुसया सिरसाठ तसेच जिल्हा आयुक्त रोव्हर रशीद पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

स्वच्छता अभियानाची सुरुवात नगरपालिका मुख्याधिकारी महेश रोकडे आणि पंढरपूरचे गटशिक्षणाधिकारी रणदिवे यांच्या हस्ते स्वच्छता रॅलीला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी शहरातील विविध भागांत स्वच्छता करून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमात श्रीमल्लकार्जुन हायस्कूल (सोलापूर), श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला (सोलापूर), माध्यमिक प्रशाला वडवळ, जि.प. प्राथमिक शाळा बारडी, राष्ट्रमाता इंदिरा कन्या प्रशाला (मोहोळ), विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (पंढरपूर), श्री माताजी निर्मलादेवी प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (पंढरपूर), श्री स्वामी समर्थ प्रशाला (आरळी), रामभाऊ जोशी हायस्कूल (करकंब), न्यू इंग्लिश स्कूल (करकंब), श्री दुर्गा शिशु विहार प्राथमिक शाळा (इसबावी), कर्मवीर विद्यालय (चारे), श्री गगनगिरी विद्यालय (सांगवी), दत्त विद्या मंदिर (सुस्ते), लोटस इंग्लिश स्कूल (कासेगाव) तसेच सांगोला विद्यामंदिर प्रशाला (सांगोला) येथील विद्यार्थी सहभागी झाले. स्वच्छता सेवा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी महादेव पुजारी, यंपे, सम धान बेद्रे, महेश भोसले, बाळासाहेब शिंगाडे आणि अशपाक मुजावर यांनी विशेष परिश्रम घेतले. या अभियानामुळे पंढरी नगरीत स्वच्छतेबाबत जनजागृती होण्यास मोठी मदत झाली असून, स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकीचे पुन्हा एकदा दर्शन घडले.

# शेतकऱ्यांना ८ तास वीज द्या; आ.पाटील यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

## भीमा नदीत मुबलक पाणी, पण विजेअभावी सिंचन ठप्प



अक्षराज : विकास सरवळे

दि.२८, पंढरपूर : भीमा नदीत सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध असतानाही कृषी पंपांना अपुरा वीजपुरवठा होत असल्याने हजारो शेतकऱ्यांच्या पिकांवर संकट ओढवले आहे. सध्या केवळ ५ तास मिळणारा कृषी वीजपुरवठा अपुरा ठरत असल्याने तो तातडीने ८ तासांपर्यंत वाढवावा, अशी जोरदार मागणी आमदार अभिजीत (आबा) पाटील यांनी सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडे केली आहे. पावसाने यंदा अनेक भागात ओढ दिल्याने भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांचा सिंचनासाठी शेतीपंपांवर मोठ्या प्रमाणात आधार आहे. मात्र, विजेचा कालावधी कमी असल्यामुळे उपलब्ध पाण्याचाही पुरेसा वापर करता येत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार अभिजीत पाटील यांनी प्रशासनाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

आमदार पाटील यांनी म्हटले आहे की, भीमा नदीत पाण्याची उपलब्धता चांगली असताना केवळ अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना रात्री-अपरात्री शेतीपंप चालवावे लागत आहेत. पाच तासांच्या मर्यादित वीजपुरवठ्यात सर्व क्षेत्राला पाणी देणे अशक्य होत असल्याने अनेक पिके पाण्याअभावी करपू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

कृषी वीजपुरवठा सलग ८ तास करण्यात आल्यास ऊस, मका, भाजीपाला, डाळी तसेच इतर खरीप पिकांना वेळेवर पाणी मिळेल. यामुळे पिकांचे नुकसान टळून उत्पादनात वाढ होईल, सिंचनाचा खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त केला आहे.

शेतकऱ्यांच्या न्याय्य मागणीसाठी आपण सातत्याने शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करत असल्याचे सांगत, जिल्हाधिकाऱ्यांनी महावितरण व संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. दुष्काळसदृश परिस्थिती आणि अनियमित पावसामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळेल. कृषी वीजपुरवठा वाढल्यास भीमा नदीतील उपलब्ध पाण्याचा प्रभावी वापर होऊन हजारो एकर क्षेत्रावरील पिकांना जीवनदान मिळणार असल्याची भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, आमदार अभिजीत पाटील यांच्या या मागणीकडे जिल्हा प्रशासन आणि महावितरण कोणता निर्णय घेते, याकडे पंढरपूर तालुक्यासह भीमा नदीकाठच्या हजारो शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# वयोवृद्ध महिलेला लुटणारे आरोपी २४ तासांत जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी



अक्षराज : प्रतिनिधी

दि.२८, कळंब (धाराशिव) : धाराशिव जिल्ह्यातील एका वयोवृद्ध महिलेची जबरी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने अवघ्या २४ तासांच्या आत अटक करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आरोपींकडून ₹३६,००० किमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र आणि जझझज कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला असून, चौकशीदरम्यान त्यांनी आणखी एका मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचीही कबुली दिली आहे. त्यामुळे पोलिसांनी एकाच कारवाईत दोन गुन्ह्यांची उकल केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे तसेच तांत्रिक तपासाच्या मदतीने पोलीस ठाणे शिराढोण येथील गुन्हा रजिस्टर क्रमांक १६२/२०२६ मधील आरोपींचा शोध घेण्यात आला. संशयितांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी सदर जबरी चोरीसह पोलीस ठाणे भूम येथील गुन्हा रजिस्टर क्रमांक ४२३/२०२६ मधील मोटारसायकल चोरीचा गुन्हाही केल्याची कबुली दिली.

या कारवाईत शिवराम ऊर्फ बेवा धनाजी पवार (वय २१, रा. लिंबी पारधी पेढ, तेरखेडा) आणि आकाश ऊर्फ बाळू दादाराव पवार (वय १९, रा. मोहा पारधी पेढ) या दोघांना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात आणखी एका साथीदाराचा सहभाग निष्पन्न झाला असून त्याचा शोध सुरू आहे.

आरोपींकडून चोरीतील ₹३६,००० किमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र आणि जझझज कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. अटक केलेल्या आरोपींना वैद्यकीय तपासणीनंतर पुढील कायदेशीर कारवाईसाठी शिराढोण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इंगळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलीस हवालदार शौकत पठाण, काशी औताडे, जावेद काझी, फरहान पठाण, पोलीस अंमलदार नागनाथ गुरव, रणदीप डिगरे तसेच ठ्ठठ पथक, विनोद इंगळे यांनी संयुक्तपणे पार पाडली. या कारवाईमुळे वयोवृद्ध महिलेला न्याय मिळाला असून, गुन्हेगारांविरोधात जलद आणि प्रभावी कारवाई करण्याची धाराशिव पोलिसांची कार्यक्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# धाराशिव जिल्हा काँग्रेसकडून MHT-CET कथित घोटाळा व विस्तार अधिकारी (शिक्षण) पदोन्नतीतील अनियमिततेविरोधात निवेदने



अक्षराज : संगीता वनकळस

दि.२८, धाराशिव : महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित MHT-CET परीक्षा प्रक्रियेत गेल्या तीन वर्षांपासून सुरू असल्याचा आरोप असलेल्या कथित घोटाळा व अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच धाराशिव जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत विस्तार अधिकारी (शिक्षण) पदोन्नती प्रक्रियेत झालेल्या गंभीर अनियमिततेची राज्यस्तरीय चौकशी करून सदर पदोन्नती प्रक्रिया रद्द करण्यात यावी, या मागण्यांसाठी दि.२८ धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी धाराशिव तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत संबंधित मंत्र्यांना निवेदने सादर करण्यात आली.

MHT-CET संदर्भातील निवेदनात परीक्षेतील कथित गैरप्रकारांमुळे लाखो विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संभ्रम व असंतोष निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करावे तसेच भविष्यात परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.

तर दुसऱ्या निवेदनात धाराशिव जिल्हा परिषद शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी (शिक्षण) पदोन्नती प्रक्रियेत शासनाचे नियम, निर्देश तसेच न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष करून पदोन्नती देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेची राज्यस्तरीय उच्चस्तरीय चौकशी करून दिनांक ३ जुलै २०२६ रोजी राबविण्यात आलेली पदोन्नती प्रक्रिया तात्काळ रद्द करावी, नव्याने पारदर्शक पद्धतीने पदोन्नती प्रक्रिया राबवावी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यासोबतच, शासनाने तातडीने योग्य निर्णय न घेतल्यास धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पुढील काळात तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. ही निवेदने जिल्हाधिकारी धाराशिव तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे आणि पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना पाठविण्यात आली आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांच्यासह राजाभाऊ शेरखाने, प्रशांत पाटील, खलील सय्यद, विनोद वीर, अग्निवेश शिंदे, सरफराज काजी, संजय गजधने, बाबा मोमीन आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वरा इंगोलेचा जिम्नॅस्टिकमध्ये उत्कृष्ट ठसा; 'सेनस्पोर्ट्स २०२६' मध्ये कांस्यपदक



अक्षराज : दिवाकर घेर

दि.२८, नागपूर : सेंटर पॉईंट स्कूल, अमरावती बायपास, नागपूर येथे आयोजित 'सेनस्पोर्ट्स २०२६' आंतरशालेय जिम्नॅस्टिक स्पर्धेत सेंट ॲन्स इंग्लिश मिडियम स्कूल, दहेगाव रंगारी येथील इयत्ता सहावीची विद्यार्थिनी स्वरा खुशाल इंगोले हिने १२ वर्षांखालील गटात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. या स्पर्धेत नागपूर शहर व जिल्ह्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या वातावरणात स्वरा हिने उत्कृष्ट कौशल्य, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण सरावाच्या बळावर दमदार सादरीकरण करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले. स्वराच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नागपूर जिल्हा जिम्नॅस्टिक संघटनेचे सचिव पुरुषोत्तम दारव्हेणकर, जिल्हा जिम्नॅस्टिक प्रशिक्षक पाटील सर, मुकेश सर, प्रशिक्षक ऋषिकेश सर, तसेच उपस्थित प्रशिक्षक, खेळाडू आणि मान्यवरांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पोंभुर्णा तालुक्यातील निवासी पट्टे द्या - अल्का आत्राम



अक्षराज : अरुण कुत्तरमारे

दि.२८, पोंभुर्णा (चंद्रपूर) : पोंभुर्णा तालुक्यातील अनेक गावा मध्ये अनेक कुटुंब पिढ्यान पिढ्या महसूल किंवा वन विभाग यांचे जागेवर आपले वास्तव्य करीत आहेत. परंतु कित्येकदा ते शासनाला अर्ज दिले परंतु अजूनही त्यावर होत नाही आहे. म्हणून आज त्या सर्वांच्या वतीने मा तहसीलदार शेलवटकर सर पोंभुर्णा यांना भेटून निवेदन दिले जेणेकरून त्या जागेवर वास्तव्य करणारे कुटुंब हे शेतकरी शेतमजूर कष्टकरी कुटुंब आहेत त्यांचा उदरनिर्वाह शेती किंवा मजुरी वर अवलंबून असतो त्यामुळे त्यांना नाहक ये जा चकरा मारून त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी यासाठी निवेदन दिले.

अल्का आत्राम यांनी सांगितले की जर या कुटुंबाकडे राहण्यासाठी स्वतःची जागा असती तर ते तुमच्या जागेवर राहून स्वतःच्या घरासाठी भांडू नसते लागले म्हणून जे प्रकरणे आपल्या कडे कागदपत्रे सहित आले आहेत त्यांना तात्काळ कार्यवाही करून निवासी पट्टे द्यावे अशी मागणी अल्का आत्राम यांनी केली त्यावेळी रोशन ठेंगणे रवींद्र गेडाम उपस्थित होते.

# धुक्याच्या दुलईत हरवले 'राणीचे नंदनवन'; पावसाळ्यात पर्यटकांनी फुलले माथेरान

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२८,कर्जत (रायगड) :** सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या आशियातील एकम`व वाहनमुक्त पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानने पावसाळ्यात पुन्हा एकदा हिरवागार शालू परिधान केला आहे. दाट धुक्याची चादर, कोसळणारे शुभ्र धबधबे, हिरवाईने नटलेले डोंगर, थंडगार वाऱ्याची झुळूक आणि निसर्गाचा मनमोहक आविष्कार अनुभवण्यासाठी राज्यभरातून पर्यटक मोठ्या संख्येने माथेरानकडे धाव घेत आहेत. विशेषतः शनिवार-रविवार आणि सुट्ट्यांच्या दिवशी पर्यटकांची मोठी गर्दी होत असून बाजारपेठ, पॉईंट्स आणि घोडेस्वारीच्या ठिकाणी उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.शार्लोट तलाव, इको पॉईंट, लुईसा पॉईंट, वन ट्री हिल, पॅनोरमा पॉईंट आणि सनसेट पॉईंट परिसरात पर्यटक निसर्गाचा मनसोक्त आनंद लुटताना दिसत आहेत. सकाळच्या वेळी संपूर्ण माथेरान परिसर धुक्याने वेढला जात असल्याने प्रत्येक



दृश्य मनाला मोहून टाकणारे ठरत आहे. सोशल मीडियासाठी छायाचित्रे आणि व्हिडिओ टिपण्यासाठीही पर्यटकांची मोठी लगबग सुरू आहे.माथेरानमधील स्थानिक व्यावसायिक, हॉटेल चालक, घोडेमालक, हातगाडी चालक आणि लहान-मोठे व्यापारी यांच्यातही सम ाधानाचे वातावरण आहे. पावसाळी पर्यटनामुळे स्थानिक अर्थचक्राला चांगली चालना मिळत असून व्यवसायात वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, मुसळधार पाऊस आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव नेरळ-माथेरान मिनी ट्रेन सेवा सध्या बंद ठेवण्यात आली असून अमन लॉज ते माथेरान शटल सेवा सुरू आहे. त्यामुळे अनेक पर्यटक अमन लॉजपर्यंत वाहनाने जाऊन तेथून पुढे पायी, घोड्यावर किंवा हातरिक्षाच्या माध्यमातून माथेरानमध्ये प्रवेश करत आहेत.प्रशासनाने पर्यटकांना दरीच्या कडेला जाऊन सेल्फी न काढण्याचे, घसरड्या ठिकाणी काळजी घेण्याचे, अधिकृत सूचना पाळण्याचे तसेच हवाम ानाचा अंदाज लक्षात घेऊनच प्रवास करण्याचे आवाहन केले आहे.

सतत पडणाऱ्या पावसामुळे काही ठिकाणी घसरडी परिस्थिती निर्माण होत असल्याने खबरदारी घेणे आवश्यक असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.यंदाच्या पावसाळ्यात माथेरानचे निसर्गरम्य रूप पर्यटकांना अक्षरशः भुरळ घालत असून, रायगड जिल्ह्याच्या पर्यटनाला नवसंजीवनी मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. येत्या काही आठवड्यांत पावसाचा जोर कायम राहिल्यास पर्यटकांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता स्थानिक व्यावसायिकांनी व्यक्त केली आहे.

# थोडक्यात बातम्या

## प्रा.अमीर इनामदार यांचा गोवा राज्यात होणार सन्मान



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२८, खंडाळा (सातारा) :** गोमंतकातील नामवंत कवी उदय वसंत ताम्हणकर यांच्या निवडक कवितेवर आयोजित केलेल्या राज्यस्तरीय खुल्या कविता सादरीकरणाचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, दि.०७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ३ वाजता इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा, पणजी गोवा येथे संपन्न होणार आहे. प्रा.इनामदार यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले असून यावेळी कवी उदय वसंत ताम्हणकर यांच्यासह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह प्रदान करुन सन्मानित करण्यात येणार असल्याचे साहिल प्रकाशन चे प्रकाशक व समारंभचे संयोजक निलेश बुगडे यांनी प्रसिद्धी निवेदनाद्वारे कळवले आहे. प्रा.अमीर इनामदार यांनी गतवर्षी महाराष्ट्र राज्यस्तरीय विविध लेखन स्पर्धेत पारितोषिक प्राप्त केले असून अटकेपार गोवा राज्यात यशाचे पाऊल ठेवले आहे. या साहित्य फलश्रुतीबद्दल यांच्या कुटुंबीयासह लोणंद, खंडाळा, बारामती अशा सर्व पंचक्रोशीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कौशल्य प्रशिक्षण मार्गदर्शन व विविध स्पर्धा परीक्षा केंद्र तसेच साहित्यप्रेमी मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कर्जतमधील कपालेश्वर मंदिरात ५४३ वे रक्तदान शिबिर उत्साहात



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.२८, कर्जत (रायगड) :** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कपालेश्वर देवस्थान समिती आणि शिवतांडव प्रतिष्ठान ढोल-ताशा ध्वज पथक, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच राजाभाऊ कोठारी यांच्या पुढाकाराने आयोजित ५४३ व्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दि.२६ जुलै २०२६ रोजी टिळक चौक येथील कपालेश्वर मंदिर परिसरात सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात ३८ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक, राष्ट्रीय आणि मानवतावादी कार्यात मोलाचे योगदान दिले. तर १४ इच्छुक रक्तदात्यांचे हिमोग्लोबिन कमी असल्याने त्यांना रक्तदान करता आले नाही. या शिबिराची सुरुवात निलेश हरिश्चंद्रे यांच्या रक्तदानाने झाली. यावेळी अजय घरत यांनी वैयक्तिक ५४ वे, ॲड. योगेश देशमुख यांनी ५२ वे तर अक्षय सुरेशभाऊ लाड यांनी २६ वे रक्तदान करून उपस्थितांचे विशेष कौतुक मिळविले. याप्रसंगी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे भालचंद्र जोशी, संदीप भोईर, अभिजित मराठे, सदानंद जोशी, मंदार लेले, विवेक भागवत, बाली परदेशी, रोनक कोठारी, खैरे काका, बंटी लोवंशी, सर्वेश गोगटे तसेच शिवतांडव प्रतिष्ठान ढोल-ताशा ध्वज पथकाचे नमित दांडेकर, नारायण भोईर, रोहित कानडे, रितेश जाधव, निहार व्यापारी, राज पाटील, साहिल गोरे आणि कपालेश्वर देवस्थान व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेंद्र यांनी उपस्थित राहून शिबिरास सहकार्य केले. रक्तसंकलनाचे कार्य घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राच्या डॉ. अनिस गाला, अनिता सिस्टर, टेक्निशियन अनघा मॅडम, शिल्पा संघवी, प्रदीप नितोरे, श्रीराम नाईक, मंगेश कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि रक्तदात्यांचे संयोजक राजाभाऊ कोठारी यांनी आभार मानले. एकदा रक्तदान – तिघांना जीवनदान, रक्तदानातून मानवतेचा सेतू अधिक दृढ होतो, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## चौथी स्कॉलरशिप परीक्षेत पीएम श्री केंद्रीय प्राथमिक शाळा, चारठाणाचा दैदिप्यमान निकाल

**अक्षराज : अलीम शेख**



**दि.२८, चारठाणा (परभणी) :** पीएम श्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, चारठाणा येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ च्या स्कॉलरशिप परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. या यशाम ुळे विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेसाठी शाळेतून एकूण २७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १६ विद्यार्थी गुणवत्तेत पात्र ठरले असून, हा निकाल शाळेच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेचा पुरावा मानला जात आहे.

**गुणवंत विद्यार्थी :-** हसनैन तहेसिन देशमुख, सिद्धार्थ गजानन तमसशेटे, समर्थ गणेश राऊत, समर्थ बालासाहेब मेहत्रे, जैदोद्दिन अजीमोद्दीन इनामदार, विनायक गणेश चोकनफळे, संघपाल निकाळजे, माऊली प्रमोद खाडे, समीक्षा गजमल, आरिब शेख, आराध्या हेंद्रे, मेहर मिर्झा, निहाल शाह, वैशाली चिंचाणे, मनीषा सासनिक आणि वेदांत हेंद्रे. या यशामागे वर्गशिक्षिका श्रीमती पाचपिंपळीकर मॅडम, मुख्याध्यापक श्री. रोडगे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांचे परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत महत्त्वाची ठरली. पालकांनी दिलेल्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना हे यश संपादन करता आले. शाळेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. शाळेचा शैक्षणिक नावलौकिक भविष्यातही असाच उंचावत राहो, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी अजय पाटील यांची निवड



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२८, सोयगांव (छ.संभाजीनगर) :** भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी अजय योगेश पाटील यांची निवड निवड झाल्याबद्दल माजी सरपंच वसंत बनकर, जिल्हा चिटणीस सुनील गव्हांडे यांनी सत्कार केला. तसेच अजय पाटील यांची भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, भाजप नेते सुरेश बनकर, ज्ञानेश्वर मोटे, जि.प.सदस्य पुष्पाताई काळे, माहिन मुलतानी, पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण, तालुकाध्यक्ष संजय पाटील,माजी नगराध्यक्ष कैलास काळे, जयप्रकाश चव्हाण, शिवाजी बुढाळ गणेश लोखंडे पंचायत समिती सदस्य राहुल राठोड, बद्रीभाऊ राठोड, गुलाबराव कोलते शहराध्यक्ष मंगेश सोहणी, राजेंद्र जावळे,योगेश पाटील, प्रमोद पाटील, मयूर मनगटे, सुनील ठोंबरे, संजय तायडे, संजीवन सोनवणे, अनीस तडवी, भैय्या परदेशी, बाळूशेट झंवर ,संजय आगे, संजय चौधरी, विशाल गिरी, सिताराम पाटील, शांताराम खराटे, संजय मंडवे, दिपक पाटील, दिलीप पाटील, समाधान बावस्कर, दिलीप चौधरी, संजय मोरे , मोतीलाल वाघ आदींसह मित्र परिवार यांनी अभिनंदन केले.

# विंचूर येथे अद्ययावत ट्रॉमा सेंटरसह शासकीय मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाची मागणी

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन; अपघातातील जीवितहानी टाळण्यासाठी आणि ग्रामीण रुग्णांच्या सोयीसाठी ग्रामसभेचा ठराव सादर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२८,विंचूर (नाशिक) :** विंचूर (ता.निफाड) आणि परिसर हा वाढत्या शहरीकरणामुळे मुख्य व्यापारी व औद्योगिक केंद्र बनला आहे. मात्र, येथे अद्ययावत आरोग्य सुविधांचा अभाव असल्याने, तातडीने आधुनिक तंत्रज्ञानयुक्तट्रॉमा सेंटरआणि सर्व सुविधांनी सुसज्जशासकीय मल्टीस्पेशालिटी रुग्णालयसुरू करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्तेनिलेश दगुजी चव्हाणयांनी जिल्हा आरोग्य अधिकारी (जिल्हा परिषद, नाशिक) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

**महत्त्वाचे दळणवळण केंद्र आणि अपघातांचा धोका**

विंचूर हे निफाड तालुक्यातील प्रमुख व्यापारी केंद्र असून येथे देशातील पहिला वाईन्स पार्क आणि आशियातील सर्वात मोठ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा उपबाजार आहे. नाशिक, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्यावर हे केंद्र असल्याने कोपरगाव, वैजापूर, गंगापूर, येवला, चांदवड, नांदगाव व सिन्नर भागातील हजारो नागरिकांची रोज वर्दळ असते.वाहतुकीची मोठी गर्दी आणि विंचूर-नाशिक, विंचूर-येवला, विंचूर-चांदवड या मार्गांवर वाढलेल्या अपघातांमुळे अनेकदा रुग्णांना तातडीने उपचारांची गरज भासते. परंतु, स्थानिक पातळीवर तातडीचे उपचार केंद्र नसल्याने रुग्णांना नाशिक किंवा इतर दूरच्या शहरात हलवावे लागते. यामुळे होणाऱ्या उशिराम ुळे रुग्णांचा जीव धोक्यात येत असून आर्थिक फटकाही बसत आहे.

**तज्ज्ञ उपचारांसाठी नाशिकवर अवलंबून**

सध्या विंचूर आणि पंचक्रोशीतील नागरिकांना हृदयरोग, मेंदूविकार, अस्थिरोग, स्त्रीरोग, बालरोग तसेच विविध शस्त्रक्रिया आणि अतिदक्षता उपचारांसाठी (खउण) नाशिक किंवा इतर शहरांवर अवलंबून राहावे लागत आहे. येथे शासकीय मल्टीस्पेशालिटी रुग्णालय झाल्यास परिसरातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना वेळेत व मोफत उच्च दर्जाचे उपचार मिळणे शक्य होणार आहे.

**प्रशासकीय पाठपुरावा आणि पुढील मागणी**

या आरोग्य प्रकल्पासाठी यापूर्वी निफाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असूनविंचूर ग्रामसभेचा अधिकृत ठरावहीजोडण्यात आला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस प्रशासकीय हालचाल झालेली नाही. त्यामुळे आता जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी तातडीने विंचूर येथेस्थळ पाहणी करून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करावा, तो शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावा आणि आवश्यक निधी मिळवून द्यावा, अशी आग्रही मागणी चव्हाण यांनी केली आहे. या निवेदनाची प्रत नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनाही (CEO) सादर करण्यात आली आहे.

# 'आजचे विद्यार्थी, उद्याचे जबाबदार नागरिक'; आरटीओचा रस्ता सुरक्षा उपक्रम

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, अंबरनाथ :** अंबरनाथ पूर्व येथील भगिनी मंडळ प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्या वतीने रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत विशेष जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांचे भान निर्माण करून सुरक्षित नागरिक घडविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सतीश खरवाडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. रस्त्यावर चालताना, सायकल किंवा वाहन चालविताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, मोबाईलचा वापर टाळणे, वेगमर्यादेचे पालन करणे आणि शिस्तबद्ध वाहतूक ही सवय लहानपणापासूनच अंगीकारली पाहिजे, असे आवाहन केले.

अंबरनाथ येथील शारदा मोटार ट्रेनिंग स्कूल यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष व प्रबोधनकार विशाल शेटे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत रस्ता सुरक्षा, वाहतूक नियम आणि अपघात प्रतिबंध याविषयी उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रसाद खरगे यांनीही विद्यार्थ्यांना वाहतूक नियम, वाहन चालविताना घ्यावयाची काळजी, हेल्मेट व सीटबेल्टचे महत्त्व तसेच सुरक्षित वाहनचालना याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. सतीश शेट्टी यांनी वाहनांच्या तांत्रिक बाबींबाबत माहिती दिली.

प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना हेल्मेट, सीटबेल्ट, वेगमर्यादा आणि शिस्तबद्ध वाहनचालना या बाबी केवळ दंड टाळण्यासाठी नसून स्वतःच्या आणि इतरांच्या जीवित सुरक्षेसाठी




अत्यावश्यक असल्याचे पटवून देण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी आणि वाहनचालकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता वाढून सुरक्षिततेची जाणीव अधिक दृढ होते, असे सतीश खरवाडकर यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शिल्पा समर्थ, शारदा मोटार ट्रेनिंग स्कूलचे संचालक अरविंद यादव तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते.

# केळघर घाट बंद; अतिवृष्टीमुळे दरड कोसळण्याचा धोका वाढल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचा निर्णय

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२८, जावली (सातारा) :** महाबळेश्वर - मेढा - सातारा - धामणेर राज्य मार्ग क्रमांक १४० वरील केळघर घाट (काळा कडा) परिसरात अतिवृष्टीमुळे डोंगर उतारावरील दरडी वारंवार कोसळत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून २८ जुलै २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत हा घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे.

उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जावळी (मेढा) यांनी तहसीलदार तथा अध्यक्ष, तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती यांना पाठविलेल्या पत्राद्वारे ही माहिती दिली आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या स्थळ पाहणीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

पत्रानुसार, केळघर घाटातील काळा कडा परिसरात



अतिवृष्टीमुळे डोंगर उतारावरील मोठ्या प्रमाणात दगड व माती रस्त्यावर कोसळत असून, या मार्गावर वाहतूक सुरू ठेवणे अत्यंत धोकादायक असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

प्रवासी व वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही जीवित अथवा वित्तहानी होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले असून खालील मार्ग खुले ठेवण्यात आले आहेत.

**मेढा – मालदेव मंदिर – मार्ली – भिलार– महाबळेश्वर,**

**मेढा – कुसुंबी – सह्याद्रीनगर – माचुतर– महाबळेश्वर**

केळघर घाटातील रस्ता सुरक्षित झाल्यानंतर व आवश्यक दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतरच वाहतूक पुन्हा सुरू करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. तोपर्यंत नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून बंदी आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.